**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२.

Email ID : compcell.mhpds@gov.in

---

क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४५/सं.क. दिनांक : १६ ऑक्टोंबर, २०२३

**प्रति,**

१) सर्व उपायुक्त (पुरवठा)
२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
३) सर्व उप नियंत्रक शिधावाटप नागरी पुरवठा, मुंबई.

विषय:- रास्तभाव दुकानस्तरावर लाभार्थ्यांची ई-केवायसी (e-KYC) मोहिम राबविण्याबाबत.

संदर्भ:- १. केंद्र शासनाचे दि.१७.०३.२०२३ रोजीचे पत्र.
२. शासनपत्र, समक्रमांक, दि.०१.०६.२०२३
३. शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.८१/सं.क. दि.०१.०९.२०२३

शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी व रास्तभाव दुकानस्तरावर ई-केवायसी मोहिम राबविण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना संदर्भाधिन दि.०१.०६.२०२३ व दि.०१.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये आधार क्रमांक संलग्न करण्यात आलेल्या शिधापत्रिकांचे आधार क्रमांक प्रमाणीकरण (Validation) कमी असणे ही चिंतेची बाब आहे. शिधापत्रिकांमध्ये ज्या लाभार्थ्यांचे आधार क्रमांक संलग्न करण्यात आले आहेत, तेच लाभार्थी अन्नधान्याचा लाभ घेत असल्याबाबत व शिधापत्रिकेमध्ये आधार नमूद असलेल्या व्यक्ती याची खात्री करण्यासाठी UIDIA यांनी ई-केवायसी सुविधा विकसीत केली आहे. केंद्र शासनाने राज्यातील सर्व लाभार्थांचे ई-केवायसी प्रमाणीकरण करण्याकरीता महिनानिहाय लक्ष्य निर्धारीत केले असून त्यानुसार लाभार्थ्यांचे ई-केवायसी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. केंद्र शासनाच्या सूचनांनूसार रास्तभाव दुकानस्तरावर १००% लाभार्थ्यांचे ई-केवायसी (e-KYC) मोहिम राबविण्याकरीता जिल्हानिहाय लक्ष्य व कालमर्यादा सोबतच्या विवरणपत्रात नमूद केले आहे.

२. रास्तभाव दुकानस्तरावर e-KYC पडताळणी प्रकीया पुर्ण झाल्यानंतर क्षेत्रीय कार्यालयांनी केंद्र शासनाच्या दि.१७.०३.२०२३ रोजीच्या पत्रातील मुद्या क्र.३.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच रास्तभाव दुकान स्तरावरून विवतरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे (e-KYC) मोहिम राबविण्याकरीता कालमर्यादेचे पालन करण्यात यावे, ही विनंती.

३. सर्व उपायुक्त (पुरवठा) यांनी त्यांच्या अधिनस्त विभागातील जिल्हयांकडून सदर कार्यवाही विहित मुदतीत पुर्ण करून घ्यावी, ही विनंती.

ने.प्र.मानकामे

(नेत्रा मानकामे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-निवडनस्ती-संगणक कक्ष